॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' grade

आज़ादी का अमृत महोत्सव

Phone : (02462) 215525 **DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT** Website: srtmun.ac.in

Fax : (02462) 215572 E-mail: dir.dsd@srtmun.ac.in

जा.क्र.वि.वि.वि./ब.शि.केंद्र/२०२४–२५/०४ दि. ०२/०७/२०२४.

प्रति,
प्राचार्य/अध्यक्ष/सचिव,
महाविद्यालये/वाचनालये/सेवाभावी संस्था,
स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड.

विषय : **शै. वर्ष २०२४– २५ साठी बहि:शाल शिक्षण केंद्र नोंदणी व नूतनीकरण प्रस्तावाबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाकडून बहि:शाल शिक्षण व्याख्यानमाला चालविली जाते. समाज प्रबोधनाचे कार्य बहि:शाल शिक्षण केंद्राकडून केले जाते. या केंद्राची स्थापना ग्रंथालय, शाळा, महाविद्यालये व इतर सामाजिक संस्थेच्या स्तरावर करता येईल. यासाठी नोंदणी शुल्क २००/– व नूतनीकरण शुल्क १००/– आहे. सदरील दोन व्याख्याने **३१ जानेवारी २०२५** पर्यंत घेऊन त्याचा अहवाल विद्यार्थी विकास विभागामध्ये सादर करणे अनिवार्य आहे.

बहि:शाल शिक्षण केंद्राने दोन व्याख्याने आयोजित करणे अनिवार्य आहे. त्यासाठी विद्यापीठाकडून नियमाप्रमाणे अनुदान तसेच बहि:शाल व्याख्यात्यांचा प्रवास व दैनिक भत्ता व मानधन देय राहील. वित्त व लेखाधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या नावे नोंदणी शुल्क रू, २००/– व नूतनीकरण शुल्क १००/– चा डी. डी. किंवा विद्यापीठाच्या लेखा विभागात रोख रक्कम भरून **दि. ३१ जुलै, २०२४** पर्यंत प्रस्ताव विद्यार्थी विकास विभागामध्ये सादर करावेत. **उपरोक्त तारखेनंतर आलेले प्रस्ताव कोणत्याही अटीवर स्वीकारण्यात येणार नाहीत**, कृपया याची नोंद घ्यावी, ही विनंती.

डॉ. सूर्यप्रकाश जाधव
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग.

श्री. अजय दर्शनकार, सीस्टीम एक्सपर्ट, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Circular Regarding Bhishal Shikshan Kendra 2024-25 या शिर्षकाखाली विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Home page मधील Administration & Students Development सदराअंतर्गत प्रसिध्दिस देण्यात यावे.

# बहि:शाल शिक्षण केंद्र नोंदणी व नुतनीकरणाबाबत अटी व नियमावली

१. प्रस्ताव दाखल करतेवेळी बॅकेचे खाते क्रमांक, आयएफएससी कोड क्रमांक व एमआयसीआर कोड क्रमांक तसेच बॅकेचे नाव व शाखा पत्त्यासह लिहणे आवश्यक आहे.

२. पत्रव्यवहारासाठी महाविद्यालये/वाचनालये/सेवाभावी संस्था यांचा अचूक पत्ता व भ्रमणध्वनी असणे अनिवार्य आहे.

३. विद्यापीठाच्या वतीने प्रत्येक बहि:शाल केंद्रास दोन वेगवेगळ्या ठिकाणी दोन व्याख्याने आयोजित केल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर रू. १०,०००/– चे अनुदान देण्यात येईल.

४. व्याख्यात्यांचे मानधन प्रवास खर्च, दैनिक खर्च विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे देण्यात येईल.

५. दोन व्याख्याने आयोजित केल्यानंतर व्याख्यानांचे टिपण, कार्यक्रमाचा फोटो, कार्यक्रम संपन्न झाल्याचे वर्तमानपत्रातून प्रसिध्द झालेल्या बातमीचे कात्रण, कार्यक्रमाचा अहवाल, विवरणासह खर्चाच्या मुळ पावत्या संचालक, विद्यार्थी विकास विभाग यांच्याकडे दि. ३१ जानेवारी, २०२५ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

६. व्याख्यात्यांने विद्यापीठ बहि:शाल सल्लागार समितीने मंजूर केलेल्या विषयाच्या यादीतील एखादया विषयावर व्याख्यान द्यावे.

७. प्रत्येक केंद्राने दोन व्याख्याने जवळच्या वेगवेगळ्या खेड्यांमध्ये आयोजित करावेत.

८. व्याख्यानासाठी फक्त विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या यादीतील व्याख्यात्यांना व्याख्यानासाठी पाचारण करण्यात यावे.

९. नियम व अटीमध्ये झालेले बदल आपणास वेळोवेळी कळविण्यात येतील.

१०. बहि:शाल शिक्षण केंद्राची स्थापना स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड,कार्यक्षेत्रात (नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली जिल्हा) केली जाते.

११. बहि:शाल शिक्षण केंद्रे महाविद्यालये, विद्यालये, सा. वाचनालय व सेवाभावी संस्था यांच्यामार्फत चालविली जातात.

१२. बहि:शाल शिक्षण केंद्राची व्याख्याने ही सर्वांसाठी खुली असतात.

१३. व्याख्यानाची तारीख व महिना वक्त्याने स्वत:ची व संबंधित केंद्राची सोय पाहून बहि:शाल शिक्षण केंद्राच्या नियमांना बाधा न येईल अशा रीतीने पूर्वपरवानगीने ठरवावयाची असतात.


१४. वक्त्याने निवडलेल्या व्याख्यान विषयावर किमान एक तास व्याख्यान देऊन श्रोत्यांशी कमीत कमी २५ ते ३० मिनिटे चर्चा करावी अशी अपेक्षा आहे.

१५. वक्त्याला मराठी भाषेची चांगली जाण असणे आवश्यक आहे.

१६. वक्त्यास बहि:शाल शिक्षण केंद्राकडून व्याख्यानासाठी तीन वेळा निमंत्रणे पाठवून देखील वक्त्याने केंद्राला काहीही न कळविल्यास त्यांचे नाव वक्ता सूचीतून कमी करण्यात येईल.

१७. संयोजकांनी नियोजित कार्यक्रमाची लेखी माहिती विद्यार्थी कल्याण विभागाला कार्यक्रमाच्या पुर्वी किमान पाच दिवस अगोदर देणे बंधनकारक आहे.

१८. वक्त्याची मांडणी राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणारी नसावी.



डॉ. सूर्यप्रकाश जाधव
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग.